## राज्याचा उन्हाळी हंगाम २०२०-२१ व खरीप हंगाम २०२१-२२ हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०७/०६/२०२१ अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात नैऋत्य मान्सूनचा पाऊस दाखल झाला आहे. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते.

कोंकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद व लातूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

दि.०७.०६.२०२१ अखेरच्या प्राथमिक नजर अंदाज अहवालानुसार दि.०४.०६.२०२१ अखेर माहे जून-२०२१ मध्ये पावसामुळे शेतीपिके व फळपिकांचे झालेल्या नुकसानीची माहिती निरंक आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

राज्यात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र १.८१ लाख हेक्टर असून दि.०७ जून, २०२१ अखेर ४.०२ लाख हेक्टर क्षेत्रावर (२२२%) पेरणी झाली आहे. उन्हाळी भात, भुईमूग, सुर्यफुल, ज्वारी, बाजरी, मका पिकांच्या काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्वमशागतीची तसेच भात पिकाच्या रोप वाटिका तयार करण्याची कामे सुरु आहेत. कोल्हापूर विभागात एकूण-११६१९ हे. क्षेत्रावर पिकांच्या पेरण्या झाल्या आहेत.

**उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी** (दि.०७ जून, २०२१ अखेर)



## उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.०७ जून, २०२१)




## उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (क्षेत्र लाख हे.) (दि.०७ जून, २०२१)



# विभागनिहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.१० लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४%) पेरणी झाली आहे. विभागात भात व भुईमूग पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्वमशागतीची तसेच भात पिकाच्या रोप वाटिका तयार करण्याची कामे सुरु आहेत.

**किड व रोग** - निरंक

## नाशिक विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.२७ लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१९९%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी भुईमूग काढणी अंतिम टप्प्यात आहे. ज्वारी, बाजरी, मका, सुर्यफुल व तीळ पिकांची काढणी पुर्ण झाली आहे. पुर्वहंगामी, सुरु ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -निरंक**

## पुणे विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.१९ लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.३८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१९७%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी बाजरी, भुईमूग व मका पिके पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरू झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप हंगाम पूर्वमशागतीची कामे सुरु झाली आहेत.

**किड व रोग - निरंक**

## कोल्हापूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.११ लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (९०%) पेरणी झाली आहे. विभागात भात, भुईमूग, मका, सुर्यफुल पिकांच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. नवीन आडसाली व पुर्व हंगामी ऊस पिक जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

मागील सप्ताहात झालेला पाऊस खरीप हंगामासाठी उपयुक्त असून विभागात भात पिकाची ९,११६ हे. वर धूळवाफ पेरणी झाली आहे. याशीवाय २,०५९ हे. क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झाली आहे. तसेच मका, भुईमूग, तूर, मूग, उडीद व ज्वारी अशा पिकांची एकूण-४४४ हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. विभागात एकूण-११६१९ हे. क्षेत्रावर पिकांच्या पेरण्या झाल्या आहेत. भातपिकाच्या रोपवाटीका टाकणेची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -निरंक**

## औरंगाबाद विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.०६ लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (६१६%) पेरणी झाली आहे. विभागात पिकांच्या काढणीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग -निरंक**

## लातूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (२११%) पेरणी झाली आहे. भुईमूग, सुर्यफुल व मका पिकांच्या काढण्या अंतिम टप्प्यात आहेत.

**किड व रोग -निरंक**

## अमरावती विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर ०.६९ लाख हेक्टर क्षेत्रावर (२२९%) पेरणी झाली आहे. उन्हाळी भुईमूग व मका पिकांच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**किड व रोग - निरंक**

## नागपूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.४७ लाख हेक्टर असून, दि.०७ जून, २०२१ अखेर १.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (२५७%) पेरणी झाली आहे. विभागात भात, भुईमूग, सोयाबीन व मूग पिकांच्या काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**किड व रोग - निरंक**

## महाराष्ट्र राज्यातील उन्हाळी हंगामातील मुख्य पिकाखालील दि.०७.०६.२०२१ अखेरचा पेरणी अहवाल

**(क्षेत्र हेक्टर मध्ये)**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र | मागिल वर्षाची पेरणी दि.०५.०६.२०२० | प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागील वर्षाच्या पेरणी क्षेत्राशी टक्केवारी | +/- (%) प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागील वर्षाच्या पेरणी क्षेत्राशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उन्हाळी भात | ५१०८८ | ८७३६० | ११८२०६ | २३१ | १३५ | ३५ |
| २ | उन्हाळी मका | ३६७०२ | ७४७६८ | ६०२६० | १६४ | ८१ | -१९ |
| ३ | इतर तृणधान्य | १८६४५ | ६०९०७ | ४९३०९ | २६४ | ८१ | -१९ |
| | **एकुण तृणधान्य** | **१०६४३४** | **२२३०३४** | **२२७७७६** | **२१४** | **१०२** | **२** |
| ४ | **इतर कडधान्य** | **३८९४** | **१२६८४** | **१८६०३** | **४७८** | **१४७** | **४७** |
| | **एकुण कडधान्य** | **३८९४** | **१२६८४** | **१८६०३** | **४७८** | **१४७** | **४७** |
| ५ | उन्हाळी भुईमुग | ६८३४८ | ८७५३० | १३४७८६ | १९७ | १५४ | ५४ |
| ६ | उन्हाळी सुर्यफुल | ६३३ | ४२१७ | २४०९ | ३८१ | ५७ | -४३ |
| ७ | उन्हाळी तीळ | १४७३ | ४०१३ | ७८३३ | ५३२ | १९५ | ९५ |
| ८ | ईतर गळीतधान्य | ३४९ | १२७६ | १०२०७ | २९२७ | ८०० | ७०० |
| | **एकुण गळीतधान्य** | **७०८०३** | **९७०३६** | **१५५२३६** | **२१९** | **१६०** | **६०** |
| | **एकुण उन्हाळी पिके** | **१८११३२** | **३३२७५५** | **४०१६१४** | **२२२** | **१२१** | **२१** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत